**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.१७०/२०२२ चे नि. क्रं.०१ खालील आदेश</u>**

सी.एन.आर. क्र. एम.एच.जे.एन.०८००१०८४२०२२

**उध्दव व ईतर —वि.— निरंक**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदारांनी मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ व ४ यांचे आजोबा व अर्जदार क्र.२ व ३ चे सासरे असुन मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे** यांचा दिनांक ०२.०८.१९९० रोजी मौजे तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे मृत्यू झालेला आहे. तसेच **भानुदास प्रभाकर बोबडे** यांचा मृत्यू दि.२१.०५.२०१४ रोजी व **केशव प्रभाकर बोबडे** यांचा मृत्यू दि.२६.०४. २०२२ रोजी मौजे तिर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना येथे झाला आहे. अर्जदार असे कथन करतात की, त्यांना अर्जदाराव्यतिरिक्त इतर कुठलेही कायदेशीर वारस नाही. अर्जदार हेच मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या दैनिक 'आनंदनगरी' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार क्र.१ ने यांनी त्यांचे अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्रं. ०८ दाखल केले. त्यांनी त्यांच्या सरतपासात त्यांच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये निशाणी क्रं.०९

व १० अन्वये मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे व भानुदास प्रभाकर बोबडे** यांचे मृत्यू प्रमाणपत्र, केशव प्रभाकर बोबडेची प्रोव्हीजनल पोस्टमॉर्टम रिपोर्टची पडताळणी केलेली प्रत नि.क्र.११, अर्जदारांचे पडताळणी केलेल्या आधारकार्डांच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे निशाणी क्रं.१२ ते १५ वर, तसेच दैनिक 'आनंदनगरी' मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन नि. क्र.१६ वर दाखल केलेले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदाराचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज विना उजर व आक्षेपविना राहिले आहे.

५. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबची पुरशिस निशाणी क्रं.१७ वर दाखल केली आहे. संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे** यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करीता खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१ उध्दव भानुदास बोबडे, क्र.०२ गंगा भानुदास बोबडे, क्र.०३ मीरा केशव बोबडे व क्र.०४ सोहम केशव बोबडे सर्व रा.तिर्थपुरी, ता.घनसावंगी, जि. जालना हे मयत नामे **प्रभाकर भानुदास बोबडे** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2022.11.23 16:53:17 +0530

**( श्रीमती एन.व्ही साहु )**

दिनांक २३/११/२०२२.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
घनसावंगी.